# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

क्र.कोविमं/माध्य.व उच्च माध्य./प्रात्य.परीक्षा देयक/शाखा लेखा/ परिपत्रक /2368 दि.३०/११/२०२३

****अत्यंत महत्त्वाचे ****

या परिपत्रकान्वये सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येते की, माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रु./मार्च २०२४ च्या प्रात्यक्षिक परीक्षेची देयके धनादेशाव्दारे अदा न करता ऑनलाईन (NEFT) व्दारे अदा करण्यात येणार आहेत. सबब प्रात्यक्षिक परीक्षेची देयके सादर करतांना खालील सुचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

**१. शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक परीक्षेच्या मुळ देयकांवर पुर्ण नांव ,पत्ता व ई-मेल आय.डी. अचूक नमुद करणे आवश्यक आहे.**

**२. शाळा/क.महाविद्यालयाच्या नांवाने ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेचे पूर्ण नांव ,खाते क्रमांक व IFSC कोड देयकावर नमूद करुन बँक पासबुकची सुस्पष्ट छायाप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.**

**३. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थी संख्या अचूक नमूद करणे आवश्यक आहे.**

**४. शाळा/क.महाविद्यालयांनी बाहय परीक्षकाचे प्रवास भत्ता देयक परिपूर्ण भरुन घेवून प्रमाणित करावयाचे आहे.**

**५. बाहय परीक्षकांचे प्रवास भत्ता देयकांवर त्यांचे स्वत:च्या नांवाचे ज्या बँकेत खाते आहे, त्या बँकेचे पूर्ण नांव ,खाते क्रमांक व IFSC कोड देयकावर नमूद करुन बँक पासबुकची सुस्पष्ट छायाप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.**

**६. शाळा/क.महाविद्यालयांनी बाहय परीक्षकाच्या प्रवास देयकावर ते ज्या मुळ शाळा/क.महाविद्यालयात कार्यरत आहेत, त्या शाळा /कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव ,पत्ता , सांकेतांक क्रमांक, मोबाईल नंबर व ई-मेल आय.डी अचूक नोंद करणे आवश्यक आहे.**

उपरोक्त सुचनांचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी संबंधित शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांच्या मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील, याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रति,

सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा /क.महाविद्यालये,
सातारा/ सांगली / कोल्हापूर